शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स लि.मुंबई या सहकारी संस्थेस भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी गठीत मंत्रीमंडळ उपसमितीची पुनर्रचना करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय, क्र: संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.२२/२२-स,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०२.०८.२०१९.

**वाचा :-** शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १६.०२.२०१८.

**प्रस्तावना :-**

शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स लि. मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे गरजूंना परवडणाऱ्या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्याकरीता भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.११.२०१७ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मा.मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर मंत्रीमंडळ उपसमितीमध्ये दिवंगत कै.पांडुरंग फुंडकर मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन) हे सदस्य आत्ता मंत्रीमंडळामध्ये नाहीत. तसेच, सदस्य-सचिव श्री.एस.एस.संधू, अपर मुख्य सचिव (सहकार) सेवानिवृत्त झाल्यामुळे गठीत मंत्रिमंडळ उपसमितीची पदनामाने पुर्नरचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल्स लि. मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे गरजूंना परवडणाऱ्या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी भाग भांडवल उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्तावाच्या अनुषंगाने मंत्रीमंडळ उपसमितीची पुढीलप्रमाणे पुर्नरचना पदनामाने करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. मंत्री (सहकार) | अध्यक्ष |
| २. | मा. मंत्री (कृषी व फलोत्पादन) | सदस्य |
| ३. | मा. राज्यमंत्री गृह (शहरे) नगरविकास | सदस्य |
| ४. | मा. प्रधान सचिव (सहकार) | सदस्य सचिव |

२. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१९०८०३१०४३५९२१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

RAJU KALLUJI NARPANDE

Digitally signed by RAJU KALLUJI NARPANDE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=445c05397d3e5fac583c028b06de2a1fa2b53743e982f5c31c9f3ffb560b0c16, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f8faa195025519ecce143f48fe16b8572d279b7779146441b412b267fb25acd8, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJU KALLUJI NARPANDE
Date: 2019.08.03 10:54:19 +05'30'

**( राजू नरपांडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, गृह (शहरे), नगर विकास, विधी व न्याय, संसदीय कार्य, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५) मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, सहकार यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे
९) सर्व सह सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) निवड नस्ती, कार्यासन-२२-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.